# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शनिवार, दिनांक २९ जून, २०२४

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) वने मंत्री** : "महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२२ -२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल आणि लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** :

**(क)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(ङ)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** **कृषी मंत्री** : **(क)** "महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४)** **गृहनिर्माण मंत्री** : "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. प्रसाद लाड, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विशेषत मुंबईत दिनांक १३ मे, २०२४ रोजी वादळीवाऱ्यासह झालेला पाऊस, त्यामध्ये घाटकोपरमधील छेडानगर येथील महाकाय जाहिरात फलक पेट्रोलपंपावर कोसळून त्यामध्ये सुमारे १६ लोकांचा झालेला मृत्यू, तसेच या अपघातात जखमी झालेल्यांची संख्या ७५ पेक्षा अधिक असणे, या अपघातात मोठ्या प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहनांची

झालेली मोडतोड, लोहमार्ग पोलीस कर्मचारी वसाहतीच्या जागेवर बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेला जाहिरात फलक, मुंबई महानगरपालिकेने दोनच दिवसापूर्वी जाहिरात फलक हटविण्याची दिलेली नोटीस, जाहिरातदाराने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, पालिकेने केलेल्या तपासणीमध्ये रेल्वे हद्दीत तब्बल ९९ होर्डींग धोकादायक असल्याची बाब समोर येणे, तसेच सदरचा पेट्रोल पंपदेखील बेकायदेशीर असल्याची बाब निदर्शनास येणे, उपरोक्त ठिकाणी आठ जाहिरात फलक उभारण्यासाठी आजुबाजूच्या झाडांवर केलेला विषप्रयोग, तसेच महालक्ष्मी स्थानकालगत असलेले महाकाय जाहिरात फलक हटविण्याबाबत एक वर्षापूर्वी रेल्वे प्रशासनाला महापालिकेने नोटीस पाठवूनही त्याकडे केलेले दुर्लक्ष, रेल्वे प्रशासनाकडून जाहिरात फलकाला परवानगी देताना मुंबई महापालिकेकडून परवानगी घेतली न जाणे, शासनाने उक्त अपघातातील मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांना आणि जखमींना जाहिर केलेली तुटपूंजी मदत, उक्त प्रकरणामुळे शासनाविरुध्द जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.प्रसाद लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईत मोठ्या प्रमाणात एडीस डासांची उत्पतीस्थाने आढळून येणे, माहे जानेवारी २०२४ ते दिनांक १४ मे, २०२४ दरम्यान २९६ डेंग्युचे रुग्ण आढळून येणे, सन २०२३ मध्ये मुंबईत डेंग्युचे सुमारे ५ हजार ४८६ रुग्ण आढळून येणे, कीटकनाशक विभागाने केलेल्या तपासणीत १ लाख ३१ हजार ९८० ठिकाणी एडीस इजिप्ती डासांची उत्पतीस्थाने आढळलेली असणे, यावर्षी जगभरात डेंग्युच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने मुंबई पालिकेच्या किटकनाशक विभागाने तपासणीमध्ये ३५ हजार ९४० ठिकाणी डेंग्युच्या डासांची उत्पतीस्थाने आढळल्याचे महापालिकेकडून जाहिर करण्यात आलेले असणे, तथापि वाढत्या डासांची पैदास होऊन उपद्रव वाढत असल्याने एडीस डासांची उत्पतीस्थाने शोधुन ती नष्ट करण्याची मोहीम शहरी व ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य विभागाने तसेच महापालिकेने हाती घेतली नसल्याने परिसरातील जनतेमध्ये शासनाप्रती निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, परिणामी डेंग्यु प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी घरोघरी जनजागृतीची मोहिम शासनाने तातडीने हाती

अस्वीकृत प्रश्न

घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड येथील रत्नदीप मेडिकल कॉलेजच्या मुला-मुलींनी कॉलेजच्या अध्यक्षांच्या व व्यवस्थापनाच्या मनमानी विरोधात शेकडो विद्यार्थ्यांनी आंदोलन केले असणे, या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सत्यशोधन समितीने घेऊन फार्मसी लॅबला सील ठोकले असणे, यामुळे रत्नदीप फाउंडेशनचे प्रकरण जामखेड तालुक्याला काळिमा लावणारे असणे, या कॉलेजच्या प्रशासनाकडून मुला-मुलींचे शारीरिक व मानसिक आर्थिक शोषण होत असल्याने अनेक मुला-मुलींमध्ये पसरलेली नैराश्येची भावना, रत्नदीप कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थीनीचे विनयभंग प्रकरणी संस्थेच्या संस्थापकावर गुन्हा नोंद करून पुढील कार्यवाही सुरू असणे, त्यामुळे या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना शासनाने तात्काळ न्याय देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, मुला-मुलींना सुरक्षितता देण्याची मागणी विद्यार्थी पालक व लोकप्रतिनिधींकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री जयंत आसगावकर, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात नव्याने शक्तीपीठ महामार्ग बांधण्यात येणार असून पत्रादेवी बांदा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) ते दीग्रज (जि वर्धा) अशा ८०५ किलोमीटर या मार्गासाठी रुपये ८६ हजार कोटी खर्च करण्यात येणार असणे, राज्यातील बारा जिल्ह्यातील २७,५०० एकर जमिनी यासाठी संपादित करण्यात येणार असणे, त्यामुळे बारा जिल्ह्यातील हजारो शेतकरी भूमिहीन होणार असल्याने या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असणे, चार वर्षापासून रत्नागिरी ते नागपूर महामार्गाचे काम सुरू असताना नव्या मार्गाचे

अग्रिम प्रत

निर्मिती करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी जाऊन प्रचंड नुकसान होणार असल्याने कोल्हापूर जिल्ह्यात दिनांक १८ जून, २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात मोर्चा काढण्याचा स्थानिक शेतकऱ्यांनी दिलेला इशारा, नवीन शक्तीपीठ महामार्गास शेतकऱ्यांकडून होत असलेला प्रचंड विरोध, याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"औद्योगिक शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगरपासून जवळच शेंद्रा येथे असलेल्या ऑरिक सिटी अंतर्गत दिल्ली, मुंबई इंडस्ट्रीअल कॉरिडोअरच्या शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक पट्ट्यात १० हजार एकर औद्योगिक भूखंड उपलब्ध असणे, उक्त औद्योगिक पट्ट्यात जागतिक दर्जाच्या औद्योगिक सुविधा असणे, तथापि, गत सात वर्षांपासून प्रकल्प आणण्यासाठी शासनास आलेले अपयश, त्यामुळे सदरहू औद्योगिक क्षेत्रात उद्योग आणण्यासाठी अनेक सामाजिक संस्था व नागरिकांनी शासनाकडे केलेला पाठपुरावा, त्याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, त्यामुळे उक्त क्षेत्रातील नागरिकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांच्यामध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करुन ऑरिक सिटी अंतर्गत दिल्ली, मुंबई इंडस्ट्रीअल कॉरिडोअरच्या शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांनी गुंतवणूक करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.सत्यजीत तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सध्या राज्यातील ९९९ रुग्णालयांचा समावेश असणे, राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये या योजनेअंतर्गत मोफत उपचार होणारे एकही हॉस्पिटल नसल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच सदरील योजनेमध्ये काही आजारांवरील उपचार व शस्त्रक्रिया जिल्हा शासकीय रुग्णालयात करण्यात येत असणे, ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये जाणे शक्य होत नसल्यामुळे

अग्रिम प्रत

अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहत असणे, त्यामुळे जिल्हा शासकीय रुग्णालयातील राखीव आजार योजनेतील समाविष्ट सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये देखील लागू करावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, तसेच राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनेअंतर्गत मोफत उपचार होणारे एक तरी रुग्णालय असावे त्यासाठी आणखी ५०० दवाखान्यांचा योजनेत समावेश करावा अशीही मागणी लोकप्रतिनिधींनी केली असणे, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दंत वैद्यकीय उपचारांचा समावेश नसल्यामुळे रुग्णांना महागडे खाजगी उपचार घ्यावे लागत असणे, त्यामुळे या योजनेत दंत वैद्यकीय उपचार करण्याची सुद्धा मागणी होत असणे, उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक ८ ते ११ एप्रिल, २०२४ या दरम्यान राज्यात नागपूर, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ तर मराठवाडयात नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली येथे तसेच खानदेशात तर ठाणे जिल्हयातील शहापूर, मुरबाड तालुक्यात आणि कोकण व पालघर विभागात पडलेल्या अवकाळी पाऊस व वादळीवाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे शेती पिकांचे, फळपिकांचे ८८ हजारांपेक्षा अधिक हेक्टरवरील क्षेत्रात मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे तसेच जनावरे दगावणे, घरांची पडझड व वीज पडून अनेकांचे झालेले मृत्यु, सदर नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानाची शासन स्तरावर जिल्हा प्रशासनांनी दखल घेऊन त्वरित पंचनामे करावे असे निर्देश शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने प्रशासनांना देण्यात येणे व तद्नंतर सदर नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे करुन भरपाई देण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १३ एप्रिल, २०२४ रोजी देण्यात येणे, तथापि अद्यापही त्याप्रकरणी कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

अग्रिम प्रत

**चार** : **म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**पाच** : **राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)**

**सहा** : **शासकीय विधेयक —**

**पुर:स्थापनार्थ :-**

"सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४"

**सात** : **(शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात सततचा पाऊस, नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा यामुळे शेतकरी संकटात आलेला असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये झालेली वाढ, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहिर करुनही अद्याप शेतकरी वंचित असणे, पीक विम्याचे नियमितपणे हप्ते भरुनही शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणे, तथापि, विमा कंपन्या दिवसेंदिवस मालामाल होणे, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई असताना टँकर माफीयांकडून नागरिकांची होत असलेली लूट, पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात आलेली "हर घर नल का जल" योजना अपयशी ठरणे, चारा छावण्या उभारण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, परिणामी पशुधनाचे झालेले नुकसान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याकडे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, माहे जानेवारी ते मे, २०२४

अप्रकाशित प्रत

या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, राज्य सरकारने ७५ हजार पद भरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अजूनही पुर्तता केलेली नसणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी रोजगारापासून वंचित असणे, जुन्या पेन्शन योजनेत असलेल्या त्रुटी, शिक्षकांच्या संच मान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी, शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध असून प्रकल्प रेटण्याचा सुरु असलेला प्रयत्न, स्मार्ट प्रिपेड योजनेमुळे ठराविक उद्योजकांना फायदा होणार असणे, वीज दरामध्ये झालेली वाढ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रलंबित असणे, महागाईत झालेली वाढ, राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये झालेली अनियमितता, तसेच गत दोन वर्षात शासनाच्या विविध विभागामध्ये अनेक भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघडकीस येणे, कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मेटाल्डिहाइड कीटकनाशके, कापूस साठवणपिशव्या, फवारणी पंप, डिजिटल मृदा आर्द्रता संवेदक या निविष्ठांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे अखर्चित राहणे, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास विभागात फर्निचर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत गैरप्रकार, जेष्ठता डावलून पदस्थापना, औषध खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा गैरव्यवहार, कामगार विभागांतर्गत बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, वाळू धोरण राबविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांची वाळू माफियांकडून होत असलेली फसवणूक, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमीनीची अत्यल्प दरात केलेली खरेदी, निवडणूक रोख्यांच्या

असुधारित प्रत

माध्यमातून देणग्या देणाऱ्या कंपन्यांना राज्यातील विविध प्रकल्पांची कोट्यवधी रुपयांची देण्यात आलेली कंत्राट, संचालक, नगररचना, पुणे यांनी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे हा निधी व्यपगत होणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत राजकीय दबावापोटी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार, पाणी पुरवठा विभागात जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे वाटप करताना ई-निविदा न राबविता केलेला गैरव्यवहार, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ जून, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत